# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या पस्तीसाव्या सभेचा कार्यवृत्तांत
## गुरुवार, दि.२१ जुलै, २०११ दुपारी १२:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची पस्तीसावी सभा गुरुवार, दि.२१/०७/२०११ रोजी दुपारी १२:०० वा.** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बंडगर बी. पी. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. सूर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ३) | डॉ. बी. बी. कदम, शिक्षण सहसंचालक सोलापूर विभाग | सदस्य |
| ४) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन., संचालक म. व वि. वि. मंडळ - पदसिध्द | सदस्य |
| ६) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| ८) | डॉ. सूर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ९) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| १०) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ११) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| १२) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| १३) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १४) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १५) | डॉ. साळुंखे डी. जे. परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १६) | डॉ. पुजारी डी. डी. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १७) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी. कुलसचिव | सचिव |

**अनुपस्थिती :**

प्रा. डॉ. पाटील टी. आर. व डॉ. शिळीमकर टी. एन. यांनी दूरध्वनीद्वारे या सभेस अनुपस्थित कळविली. याची नोंद घेण्यात आली.

**स्वागतः**

मा.कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ] दि.१९ मे, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव : दि.१९ मे, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह वाचून कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**१) पान क्र. १६/१६ वरील, ठराव क्र. १७(५) मधील अ.क्र. ३ वगळण्यात यावा.**

**[ २ ] महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

**ठराव : महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरुमहोदयांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] कला व ललित कला, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा अध्यादेश क्र. ११ (O.B.A.२) व वाणिज्य विद्याशाखा अध्यादेश क्र. १३ (O.B.Com.२) या सुधारीत केलेल्या अध्यादेशास मा. कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषेदच्या वतीने मान्यता देऊन, केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

**(टिपणी -** सत्र पध्दती अभ्यासक्रमासाठीचे अध्यादेश क्र. १० ते २३ पत्र क्र.SOL/BOS/9826 dt.24/6/2009 अन्वये यापूर्वी मा. कुलपती कार्यालयाकडे पाठविण्यात आलेले आहेत. सदर अध्यादेशाबाबत म. वि. का.१९९४ कलम ५४ (४) नुसार, कोणत्याही स्वरुपाचे आक्षेप न आल्याने, शै. वर्ष २०१०-११ पासून लागू करण्यात आलेले आहेत.

परंतु सदर अध्यादेशामध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याने मा. अधिष्ठाता, कला व ललित कला, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, तसेच वाणिज्य विद्याशाखा यांनी सदरच्या अध्यादेशामध्ये सुधारणा (Amendment) करुन विद्यापरिषदेकडे शिफारस केलेली आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५४(१) नुसार, अध्यादेशामध्ये सुधारणा केल्याच्या बाबीस मा. कुलगुरुमहोदयांनी म. वि. का. १९९४ कलम १४ (७) अन्वये, विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता देऊन व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेली आहे.

**कला व ललित कला, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा अध्यादेश क्र. ११ (O.B.A.2) व वाणिज्य विद्याशाखा अध्यादेश क्र. १३ (O.B.Com.2) या सुधारीत केलेल्या अध्यादेशास मा. कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषेदच्या वतीने मान्यता देऊन, केलेली कार्यवाही माहितीस्तव.)**

**ठराव : मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०४ ] वर्ग १ व २ च्या शिक्षकेतर (प्रशासकीय) पदांसाठी सरळसेवेने नियुक्ती करण्यासाठी पुनश्चः दिलेली जाहिरात माहीतीस्तव.**

(टिपणीः विद्यापीठाने प्रसिध्द केलेली वर्ग १ व २ च्या पदाची जाहिरात क्र. सोविसो/आस्था/३८/२०१०, दि.१७/०१/२०११ नुसार प्राप्त झालेल्या छाननी करुन छाननी समितीने याद्या तयार करुन दिलेल्या आहेत. त्याचा सारांश खालीलप्रमाणे.

| **अ.क्र** | **पदाचे नाव** | **रिक्त पद** | **प्राप्त संख्या** | **पात्र अर्ज** | **अपात्र अर्ज** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | उपकुलसचिव | अनु.जाती - ०१ | १६ | ०७ | ०९ |
| ०२ | सहाय्यक कुलसचिव | खुला - ०१ | ३७ | १८ | १९ |
| ०३ | सिस्टीम ॲनालिस्ट | अनु.जाती - ०१ | १४ | ०२ | १२ |
| ०४ | प्रोग्रामर | खुला - ०१ | ३२ | ०८ | २४ |

सदर जाहिरातीस अनुसरुन कमी अर्ज आल्याने पुन्हा जाहिरात क्र.सोविसो/आस्था/५१/२०११ दि.१७-०६-२०११ नुसार प्रसिध्द करण्यात आली आहे. . (त्याची प्रत सोबत जोडली आहे.)

मा. कुलगुरु सो। यांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठरावः मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०५ ] वर्ग ०३ व ०४ च्या शिक्षकेतर (प्रशासकीय) पदांसाठी सरळसेवेने नियुक्ती करण्यासाठी विद्यापीठ जाहिरात क्र.सोविसो/आस्था/३२/२०१० दि.०८-३-२०१० नुसार प्राप्त अर्जाची प्रक्रिया सुरु करण्यास मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने दिलेली मान्यता माहीतीस्तव.**

(टिपणी : विद्यापीठातील वर्ग ०३ व ०४ च्या शिक्षकेतर (प्रशासकीय) पदांसाठी सरळसेवेने नियुक्ती करण्यासाठी विद्यापीठ जाहिरात क्र.सोविसो/आस्था/३२/२०१० दि.०८-३-२०१० नुसार प्रसिध्द करण्यातआली होती. (त्याची प्रत सोबत जोडली आहे.)

भरती प्रक्रियेस शासन निर्णय क्रमांक असंक-१०१०/प्रक्र-१/२०१०/वित्तीय सुधारणा-१ दि.०५ जून, २०१० नुसार एक वर्षाकरिता गट क व ड मधील पदे भरण्यास निर्बंध घालनेत आला. (सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.) त्याची मुदत ४ जुन २०११ रोजी संपलेली आहे. त्यानंतर मात्र शासनाचे काणतेही परीपत्रक आलेले नाही अथवा शासनाच्या संकेतस्थळावर नाही.

सदर भरती प्रक्रिया पुर्वीचेच अर्ज कायम ठेवून पुर्ण करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मा. कुलगुरुसाो यांनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, १४ (७) नुसार मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम २८(t) नुसार व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मा. कुलगुरुसाो यांनी जाहिरात क्र.सोविसो/आस्था/३२/२०१०दि.०८-३-२०१०अनुषंगाने नेमलेल्या, छाननी समितीच्या दि०५/०६/२०१० रोजीच्या बैठकीत शिफारस केल्याप्रमाणे लेखी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा, व्यासायिक परीक्षा व मुलाखत इ. प्रक्रिया राबविण्यास मा. कुलगुरुसाो यांनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, १४ (७) नुसार मान्यता दिलेली आहे. **(छाननी समितीच्या बैठकीच्या कार्यवृतांताची प्रत सोबत जोडली आहे.)**

तरी जाहिरात क्र.सोविसो/आस्था/३२/२०१०दि.०८-३-२०१०अनुषंगाने पुढील भरती प्रक्रिया पुर्ण करण्याबाबत व छाननी समितीच्या दि०५/०६/२०१० रोजीच्या बैठकीत शिफारस केल्याप्रमाणे लेखी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा, व्यासायिक परीक्षा व मुलाखत इ. प्रक्रिया राबविण्याबाबत मा. कुलगुरु सो यांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहीतीस्तव).

**ठराव: मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०६ ]  गट-क व गट-ड संवर्गातील पदभरतीवरील निर्बंधाची मुदत वाढविल्याबाबतची बाब माहितीस्तव.**

(टिपणी : महाराष्ट्र शासन निर्णय क्र. पदनि २०११/प्र.क्र. ११०/११/वित्तीय सुधारणा-१ दिनांक ३० जून, २०११ नुसार गट -क व गट-ड संवर्गातील पदभरतीवरील निर्बंधाची मुदत सदर शासन निर्णयापासून अजून एक वर्षासाठी वाढविण्यात आलेली आहे. सदरचा शासन निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या माहीतीस्तव).

**ठराव:  मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०७ ] शैक्षणिक वर्ष २०११ - १२ करिता विद्यापीठातील विविध संकुलासाठी प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापकांची तात्पुरती पदे निर्माण करुन Walk-in-Interview व्दारे भरती प्रक्रिया पूर्ण झाली आहे ही बाब माहितीस्तव.**

(टिपणी : विद्यापीठातील संकुलासाठी / विभागासाठी मागील शैक्षणिक (२०१०-११) वर्षाप्रमाणेच विद्यापीठाने दिलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने स्थानिक निवड समितीची बैठक दिनांक १७/०६/२०११, १८/०६/२०११ व २०/०६/२०११ रोजी आयोजित करुन Walk-in-Interview व्दारे उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या असून स्थानिक निवड समितीच्या शिफारशीनुसार निवड झालेल्या उमेद्वारांना नियुक्ती आदेश निर्गमित करुन सेवेत रुजू करुन घेण्यात आले आहेत. त्याचा सारांश खालील तक्यात दर्शविल्याप्रमाणे आहे.

| अ. क | संकुलाचे नाव/ विभाग | पद | पदसख्ंया | वेतन अनुदानातून दरमहा खर्च रु. | विद्यापीठ फंडातून दरमहा खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पदार्थविज्ञान संकुल | सहाय्यक प्राध्यापक | ०२ | १६८००/- | ५२००/- |
| २ | भूशास्त्र संकुल | सहाय्यक प्राध्यापक | ०४ | ३३६००/- | ७२००/- |
| ३ | संगणकशास्त्र संकुल | सहाय्यक प्राध्यापक | ०८ | ६७२००/- | १८०००/- |
| ४ | सामाजिकशास्त्रे संकुल | सहाय्यक प्राध्यापक | ०३ | -- | २८८००/- |
| ५ | रसायनशास्त्र संकुल | सहाय्यक प्राध्यापक | ०७ | -- | ६००००/- |
| ६ | शिक्षणशास्त्र विभाग | सहयोगी प्राध्यापक | ०१ | -- | ११२०००/- |
| | | सहाय्यक प्राध्यापक | ०८ | | |
| ७ | एम.बी.ए विभाग | सहाय्यक प्राध्यापक | ०२ | -- | २४०००/- |
| | | **एकूण** | **३५** | **११७६००/-** | **२५५२००/-** |

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७७ मधील तरतूदी प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात पदे निर्माण करुन Walk-in- Interview व्दारे भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात येवून सोबत शिक्षकांची विहित यादी जोडण्यात आली आहे. दिनांक १३ जून, २०११ व ०१ जुलै, २०११ पासून शैक्षणिक वर्ष सुरु झाल्याने मा. कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही सबब, व्यवस्थापन परिषदेसाठी माहितीस्तव.)

**ठराव : मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०८ ] कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी पूर्व अट म्हणून निम्न संवर्गात /सेवेत/श्रेणीत किमान सेवेच्या अनुभवाची अट विहित करणेबाबत विचारार्थ.**

(टिपणी : महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-२००५/प्र.क्र.०१/२००५/१२,दिनांक २५ फेब्रुवारी,२००५नुसार, शासकीय कर्मचाऱ्यांना गट क (वर्ग-३) पासुन गट अ (वर्ग-१) मधील सर्व टप्प्यापर्यंतच्या आंतरश्रेणी पदोन्नसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती करताना निकटतम निम्न पदावर नियमित तीन वर्षाच्या किमान सेवेची अट पदोन्नतीसाठी पूर्व अट म्हणून राहील असे नमूद केले आहे.

सध्या विद्यापीठातील गट क (वर्ग-३) मधून गट ब (वर्ग-२) पर्यतच्या कर्मचा-यांना पदोन्नती करताना निकटतम निम्न पदावर नियमित तीन वर्षाच्या किमान सेवेची पदोन्नतीसाठीची पूर्व अट लागू आहे.

सध्या विद्यापीठातील गट ब (वर्ग-२) मधुन अ (वर्ग-१) पर्यंतच्या कर्मचा-यांना पदोन्नती करताना निकटतम निम्न पदावर नियमित पाच वर्षाच्या किमान सेवेची पदोन्नतीसाठी अट लागू आहे.

सध्या विद्यापीठाने गट अ (वर्ग ०१ च्या) पदासाठी जाहिरात क्र. सोविसो/आस्था/५१/२०११ दि. १७/०६/२०११ दिलेली असून त्यामध्ये गट ब मधील पाच वर्षाच्या निम्न संवर्गात / सेवेत/ श्रेणीत काम केलेला अनुभव मागणी केलेला आहे. (सदरची जाहिरात सोबत जोडली आहे.)

तरी उपरोक्त शासन निर्णयानुसार गट अ (वर्ग-१) च्या पदासाठी पदोन्नती देताना निकटतम निम्न पदावर तीन वर्षाच्या किमान सेवेचे अट पदोन्नतीसाठीची पूर्वअट लागू करुन त्याप्रमाणे पदोन्नती देण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: सदरचा विषय अमान्य करण्यात आला.**

**[ ०९ ] डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे आणि सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय / महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करण्याबाबतचा करारनामा संदर्भात मा.कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

**(टिपणी :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे व सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय/महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केद्र सुरु करण्याबाबतच्या प्रस्तावास दिनांक ३०.०८.२०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेमध्ये खालील प्रमाणे ठराव क्रमांक ३ अन्वये मान्यता देण्यांत आलेली आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे आणि मुंबई यांच्या संयुक्त विद्यामाने केंद्रीय / महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांकरीता विशेष मार्गदर्शन केंद्र विद्यापीठात सुरु करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

उपरोक्त ठरावानुसार महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे-१ यांना विद्यापीठाचे पत्र क्र.११५१, दि. १९.०५.२०११ रोजीच्या पत्रान्वये सुमारे रु.४०,९१,०००/- उपरोक्त संस्थेस सुधारित प्रस्ताव म.वि.वि.मं, विभागाने सादर केला.

सदर प्रस्तावास अनुसरुन उपरोक्त संस्थेने दि.३०.०५.२०११ रोजीचे पत्र क्र.डॉआंसवेप्रसं / पुणे / माविकेंलोकसेआयोग / २०११-१२ / ५६६, अन्वये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाकरिता रु.२०.०० लाख निधी खाली नमुद केलेल्या बाबींवर खर्च करण्यास मंजुरी देण्यात येत असल्याचे कळविले. (सदरचे पत्र अवलोकनार्थ सोबत जोडलेले आहे). याचा तपशिल खालीलप्रमाणे :

| Sr.No. | Expenses Head | Sanctioned Amount in Lakh |
|---|---|---|
| 1 | Stipend for Students | Rs.12.00 Lakhs |
| 2 | Stationery | Rs.00.50 Lakhs |
| 3 | Remuneration to Teachers | Rs.03.00 Lakhs |
| 4 | Purchases of Books | Rs.02.00 Lakhs |
| 5 | Contingency | Rs.00.50 Lakhs |
| 6 | Staff Expenses | Rs.02.00 Lakhs |
| | **Total :-** | **Rs.20.00 Lakhs** |

उपरोक्त नमुद केलेल्या बाबींवर रु.२०.०० लाख एवढ्या योजनेचा आराखडा १२ महिन्याच्या प्रशिक्षण कालावधीसाठी मंजुर करण्यात आला असून सदर संस्थेने जाहिरातीचा मसुदा तसेच करारनाम्याचा मसुदा स्वाक्षरी करून परत पाठविण्याबाबत कळविलेले आहे. सदर करारनाम्यास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (f) नुसार व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सदरचा करारनामा उपरोक्त संस्थेस वेळेत पाठविणे अनिवार्य आहे. यास्तव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने सदर करारनाम्यासंदर्भात केलेली कार्यवाही माहितीस्तव).

**ठराव: मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ १० ] विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा पालकासह, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचा विमा उतरविण्याबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणीः विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा पालकासह , शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचा विमा उतरविण्यासाठी दि.०६/०६/२०११ रोजीच्या दै. सकाळ या वृत्तपत्रातून जाहिर प्रस्ताव मागविण्यात आलेले होते. तसेच सदर प्रस्तावाची जाहिरात विद्यापीठाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार एकूण ३ विमा कंपनीचे प्रस्ताव प्राप्त झालेले होते. प्राप्त झालेल्या विमा प्रस्तावांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडलेला आहे. तुलनात्मक तक्त्यानुसार न्युनतम दर असलेली कंपनी दि.न्यू इंडीया एश्योरन्स कं. लि. ,सोलापूर यांना वाटाघाटीसाठी बोलविण्यात आलेले हाते. वाटाघाटीमध्ये दि.न्यू इंडीया एश्योरन्स कं. लि. ,सोलापूर यांनी त्यांचा दर रू.१३/- प्रति विद्यार्थी व त्यांचे पालक एकत्रित, रू.१३/- प्रति शिक्षक व प्रशासकीय कर्मचा-याचा विमा उतरविण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामूळे न्युनतम दर असलेली कंपनी दि.न्यू इंडीया एश्योरन्स कं. लि. ,सोलापूर यांच्या कडून विमा उतरविण्याची शिफारस करण्यात आलेली होती.

विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष सूरू झालेले असल्याने सदरची विमा पॉलीसी ही विद्यार्थी प्रवेश घेतल्यापासून अथवा विमा कंपनीकडे विमा रक्कम जमा केलेपासून सूरू होणार असल्याने व सदरचा प्रस्ताव महाविद्यालयांना त्वरीत कळविणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम १४ (७) नूसार मा.कुलगुरूमहोदयांनी सदर प्रस्तावास व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे. मा.कुलगुरूमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहतीस्तव).

**ठरावः मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ११ ] मा. अध्यक्ष, शाहीर विश्वासराव फाटे लोककला प्रतिष्ठान, मोहोळ यांनी दिलेला ग्रंथसंग्रह विद्यापीठ ग्रंथालयास देणगीदाखल स्विकारण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी - मा. अध्यक्ष, शाहीर विश्वासराव फाटे लोककला प्रतिष्ठान, मोहोळ, ता. मोहोळ जि.सोलापूर यांचे दि.१३/०६/२०११ चे पत्र या टिपणीसोबत जोडले आहे. मा. अध्यक्ष, शाहीर विश्वासराव फाटे लोककला प्रतिष्ठान, मोहोळ, यांनी सदर प्रतिष्ठानचे संस्थापक स्वर्गीय शाहीर विश्वासराव फाटे यांनी स्वत: लिहिलेली पाच व त्यांच्यावर इतर पाच लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकांच्या प्रत्येकी दोन प्रती याप्रमाणे एकूण २० पुस्तके सोलापूर विद्यापीठाच्या ग्रंथालयास देणगी म्हणून दिलेली आहेत. सदरचे ग्रंथ विद्यापीठ ग्रंथालयास देणगीदाखल स्विकारण्याची बाब महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २८ (h) अन्वये विचारार्थ).

**ठराव: मा. अध्यक्ष, शाहीर विश्वासराव फाटे लोककला प्रतिष्ठान, मोहोळ यांनी दिलेला ग्रंथसंग्रह विद्यापीठ ग्रंथालयास देणगीदाखल स्विकारण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १२ ] डॉ. दिलीप दत्तात्रय कदम यांचे ६ महिने पूर्वीचे देयक आदा करण्यास मान्यतेस्तव.**

(टिपणी: महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ अंतर्गत जनविकास केंद्र हा विभाग कार्यरत आहे. सदर केंद्रामार्फत आरोग्य सहाय्यक हा अभ्यासक्रम सुरु आहे. सदर अभ्यासक्रमाच्या परीक्षा जनविकास केंद्रामार्फत घेण्यात येतात. सन २००९-१० या कालावधीची परीक्षा माहे जून-२०१० मध्ये घेण्यात आली होती. सदर अभ्यासक्रमाच्या पेपर क्रमांक ३ या विषयाची पेपर तपासणीसाठी डॉ.दिलीप दत्तात्रय कदम यांना दिनांक २७/०७/२०१० ते ३०/०७/२०१० या कालावधीत बोलाविण्यात आले होते. त्यांनी सदर कालावधीत एकूण १३४ पेपर तपासलेले आहेत. त्याचे देयक दिनांक २८/०६/२०११ रोजी सादर केले आहे.

सदरचे देयक सहा महिन्या पूर्वीचे असल्याने विद्यापीठ दंडक क्रं. O.122 (1) अन्वये एकूण देयकाच्या १० टक्के रक्कम वजा करुन देयक आदा करावे लागणार आहे. सोबत देयक जोडले आहे.

सबब सदर देयकातून १० टक्के रक्कम वजा करुन देयक आदा करण्याची बाब विचारार्थ.)

**ठराव: डॉ. दिलीप दत्तात्रय कदम यांचे ६ महिने पूर्वीचे देयक आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १३ ] अभियांत्रिकी विद्याशाखातंर्गत महाविद्यालयाचे व आजतागायत कार्यालयास प्राप्त व पहिल्या बैठकीत मंजूर झालेले कांही दुरुस्तीस आलेल्या प्रस्तावावर सोबतच्या तक्त्यात शिक्षकांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे चेंजिस इन स्टाफच्या समितीने केलेल्या शिफारशीस दंडक ६५ अन्वये विचारार्थ.**

(टिपणी : दि. ०८-०४-२०११, १८-०४-२०११ व २५-०४-२०११ रोजीच्या चेंजिंस-इन-स्टाफ बैठकीत अभियांत्रिकी विद्याशाखासंदर्भात चेंजिंस इन स्टॉफचे प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावेत, असे ठरले या अनुषंगाने, १५ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे १९५ चेंजिस इन स्टाफ प्रस्ताव महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, विभागाकडे प्राप्त झालेले आहेत. आजतागायत कार्यालयास प्राप्त व पहिल्या बैठकीत मंजूर झालेले कांही दुरुस्तीस आलेल्या प्रस्तावावर सोबतच्या तक्त्यातील शिक्षकांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे चेंजिस इन स्टाफच्या मान्यतेच्या शिफारशी केलेल्या आहेत. सदर शिफारशींना दंडक ६५ प्रमाणे व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. यास्तव चेंजिस इन स्टाफ समितीच्या शिफारशी विचारार्थ)

**ठरावः अभियांत्रिकी विद्याशाखातंर्गत महाविद्यालयाचे व आजतागायत कार्यालयास प्राप्त व पहिल्या बैठकीत मंजूर झालेले कांही दुरुस्तीस आलेल्या प्रस्तावावरील विषयासोबतच्या तक्त्यात शिक्षकांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे चेंजिस इन स्टाफच्या समितीने केलेल्या शिफारशीस दंडक ६५ अन्वये मान्यता देण्यात आली.**

**[ १४ ] सोलापूर विद्यापीठाच्या [Architect Panel] वास्तुविशारद सूची मध्ये नविन वास्तुविशारदांचा समावेश करणेबाबत.**

(टिपणी : सोलापूर विद्यापीठाच्या आवारातील विविध इमारतीच्या बांधकामासाठी यापूर्वी व्यवस्थापन परिषद ठराव क्र. ९ [२] दि.४/९/२००८ नुसार खालील वास्तुविशारद पॅनेल तयार करणेत आले होते.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. श्रीनिवास कंची, सोलापूर | |
| २ | मे. खमितकर ॲन्ड असोसिएटस, सोलापूर | |
| ३ | मे. डिझाईन ग्रुप, मुंबई | |
| ४ | मे. इन्व्हायरन्स, पुणे | |
| ५ | श्री. केदार कुलकर्णी, पुणे | |
| ६ | श्री. चंद्रकांत दिवटे, कोल्हापूर | |
| ७ | श्री. सत्यजित पाटील, सांगली | |
| ८ | श्रीमती सिमंतीनी चाफळकर, सोलापूर | - लॅन्डस्केप आर्किटेक्ट |
| ९ | श्री. डिझाईन सेंटर, लातूर | - लॅन्डस्केप आर्किटेक्ट |

विद्यापीठ परिसरातील विविध बांधकामाच्या कामासाठी वरील फर्मना काम देण्यात आले आहे. तसेच प्रस्तावित बांधकामाच्या कामासाठी वास्तुविशारद म्हणून काम करण्यास श्रीनिवास कंची, सोलापूर व मे. इन्व्हायरन्स, पुणे यांनी तयार नसलेचे कळविले आहे.

त्यानंतर वास्तुविशारद पॅनेलमध्ये नव्याने समाविष्ट करणेकरिता दि.२५/६/२०११ च्या दै.पुढारी या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे वास्तुविशारदांचे अर्ज प्राप्त झाले.

१ श्री. निरंजन संगावार, सोलापूर- वास्तुविशारद

२ श्री. विक्रम गडदे, सांगली- वास्तुविशारद

३ श्री.ऋषिकेश कुलकर्णी- आर्किटेक्चरल ॲन्ड इंटिरियर डिझाईनिंग ॲन्ड कन्सल्टंट

विद्यापीठाच्या वास्तुविशारद पॅनेल मध्ये वरील तीन फर्मचे नाव समाविष्ट करणेबाबत दि.०२/७/२०११ रोजी झालेल्या बांधकाम समिती समोर विषय ठेवला असता बांधकाम समितीने ठराव क्र. ४[१] नुसार वरील तीनही नावांचा वास्तुविशारद सूचीमध्ये समावेश करणेस शिफारस केलेली आहे.

सबब विद्यापीठाच्या वास्तुविशारद पॅनेल मध्ये वरील तीन फर्मचे नाव समाविष्ट करणेची बाब विचारार्थ]

ठरावः **सोलापूर विद्यापीठाच्या [Architect Panel] वास्तुविशारद सूचीमध्ये खालील नविन वास्तुविशारदांचा समावेश करण्याबाबत बांधकाम समितीने केलेली शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.**

**१. श्री. निरंजन सांगवार, सोलापूर - वास्तुविशारद**

**२. श्री. विक्रम गडदे, सांगली - वास्तुविशारद**

**३. श्री. ऋषिकेश कुलकर्णी - आर्किटेक्चरल ॲन्ड इंटेरिअर डिझाईनिंग ॲन्ड कन्सल्टंट**

**[ १५ ] सोलापूर विद्यापीठ परिसरातील विविध इमारती तसेच सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र इमारतीच्या साफसफाई कामाबाबत फेर जाहीर निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेची बाब विचारार्थ.**

(टिपणी :- वरील विषयांकित विद्यापीठ इमारतीच्या साफसफाई कामासंबंधी दि.१९/०५/२०१० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र. १० | सोलापूर विद्यापीठ परिसरातील विविध इमारती तसेच सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र इमारतीच्या साफसफाई कामाबाबत पुनश्चः निविदा मागवून प्रक्रिया करावी असे ठरले. |

उक्त ठरावाप्रमाणे विषयांकित विद्यापीठ इमारतीच्या साफसफाई कामासंबंधी फेर जाहीर निविदा सूचना दि.२४/०५/२०११ रोजीच्या दै. संचार या दैनिकांमधून देण्यात येवून अंतिम दि.१६/०६/२०११ पर्यत निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

अंतिम दिनांकापर्यत विद्यापीठ कार्यालयास तीन फर्मकडून निविदा प्राप्त झालेल्या आहेत. निविदा प्राप्त झालेल्या फर्मच्या प्रतिनिधींसोबत दि. १६.०६.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता वाटाघाटी करण्यात आल्या. त्याचा तक्ता सोबत जोडला आहे. त्यानुसार सर्वात कमी दर असलेले मे.भंडारी कन्स्ट्रक्शन ॲन्ड सर्व्हिसेस, ३, हुडको, रुम नं. अे-५१, कुमठा नाका, मार्कडेय नगर, सोलापर-३ यांचे रु. ३२,५००/- [अक्षरी रु.बत्तीस हजार पाचशे फक्त] प्रति महिना या दराने अकरा महिन्याच्या कालावधीसाठी देण्याबाबत विचारार्थ.

तसेच यापूर्वीचे इमारतीच्या साफसफाई करणा-या ठेकेदार मे.रामचंद्र डी.साठे यांची कामाची मुदत दि. १४.०६.२०११ रोजी संपत असल्याने पुढील एक महिन्याची वर्क ऑर्डर देण्याबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

ठरावः

**१) सोलापूर विद्यापीठ परिसरातील विविध इमारती तसेच सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र इमारतीच्या साफसफाई कामाबाबत फेर जाहीर निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेस व सर्वात कमी दर असलेले मे. भंडारी कन्स्ट्रक्शन ॲन्ड सर्व्हिसेस, ३ हुडको, रुम नं.ए-५१, कुमठा नाका, मार्कंडेय नगर, सोलापूर - ३ यांचे रु.३२,५००/- प्रति महिना या दराने अकरा महिन्याच्या कालावधीसाठी देण्यास मान्यता देण्यात आली**

**२) तसेच यापूर्वीचे इमारतीच्या साफसफाई करणाऱ्या ठेकेदार मे. रामचंद्र डी. साठे यांची कामाची मुदत दि.१४/०६/२०११ रोजी संपत असल्याने पुढील एक महिन्याची वर्क ऑर्डर देण्याबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ १६ ] विद्यापीठाच्या इमारतीवर "सोलापूर विद्यापीठ" या आशयाचे Neon Sign बसविणे कामाबाबत जाहीर निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेची बाब विचारार्थ.**

(टिपणी - विद्यापीठाच्या इमारतीवर " **सोलापूर विद्यापीठ** " या आशयाचे Neon Sign बसविणे कामाची जाहीर निविदा सूचना दि.२४/०५/२०११ रोजीच्या दै.सकाळ या वर्तमानपत्रात देण्यात येवून अंतिम दि.१६/०६/२०११ पर्यत निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

अंतिम दिनांकापर्यत विद्यापीठ कार्यालयास तीन फर्मकडून निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्याचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. त्यानुसार सर्वात कमी दर असलेले मे. प्रभात न्युऑन, पुणे यांचे अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,३४,८१७/- पेक्षा ११ % जास्त दराने रु.१,४९,६४७/- [सर्वात कमी दराची निविदा] काम करण्यास दि.०२/७/२०११ रोजी झालेल्या बांधकाम समितीने व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी शिफारस केलेली आहे.

सबब विद्यापीठाच्या इमारतीवर " **सोलापूर विद्यापीठ** " या आशयाचे Neon Sign बसविणेचे काम मे. प्रभात न्युऑन, पुणे यांना अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,३४,८१७/- पेक्षा ११ % जास्त दराने रु.१,४९,६४७/-[सर्वात कमी दराची निविदा] देणेबाबत विचारार्थ).

**ठरावः विद्यापीठाच्या इमारतीवर "सोलापूर विद्यापीठ" या आशयाचे Neon Sign बसविणे कामाबाबत जाहीर निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेस व सर्वात कमी दर असलेले मे. प्रभात न्युऑन, पुणे यांचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,३४,८१७/- पेक्षा ११% जास्त दराने रु.१,४९,६४७/- या रकमेस काम करण्यास बांधकाम समितीने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ १७ ] संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त होणा-या महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / विद्याशाखा बंद करण्याच्या अर्जाचे शुल्क व प्रक्रिया शुल्क निश्चित करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः संलग्नित महाविद्यालयांकडून महाविद्यालये / विषय / अउपरोक्त विषयास अनुसरुन विद्यापीठाकडे महाविद्यालय, विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी व विद्याशाखा बंद करण्याबाबत संलग्नित महाविद्यालयांकडून / संस्थेकडून, (Closure) प्रस्ताव प्राप्त होतात.

उपरोक्त संदर्भातील प्रस्ताव स्विकारण्याकरीता विद्यापीठाकडे विहीत अर्ज उपलब्ध नाही. त्यास्तव संलग्नित महाविद्यालयांकरीता महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / विद्याशाखा बंद करणेकामी अर्जाचा नमुना (Closure Form ) तयार करणे, सदर अर्जाचे शुल्क व प्रक्रिया शुल्क निश्चित करणे आवश्यक आहे. यास्तव मा.कुलगुरु महोदयांनी खालील प्रमाणे त्रिसदस्यीय समिती नियुक्त केलेली होती.

१.प्रा.डॉ.लोणीकर एस.व्ही, अध्यक्ष , २.प्रा.डॉ.पी.बी.जोशी, सदस्य
३.प्राचार्य डॉ.बी.एम भांजे, सदस्य

उपरोक्त समिती सदस्यांनी अर्जाचा नमुना तयार करुन सदर नमुना विद्यापरिषदेस व सदर अर्जाचे शुल्क रु. १००० / - व प्रक्रिया शुल्क रु. १०,००० / - निश्चित करुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब संलग्नित महाविद्यालयांकडून महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / विद्याशाखा बंद करण्याबाबत सादर करण्यात येणा-या प्रस्तावांच्या अर्जाचे शुल्क रु.१००० /- व प्रक्रिया शुल्क रु.१०,००० /- निश्चित करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठरावः **संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त होणा-या महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / विद्याशाखा बंद करण्याच्या अर्जाचे शुल्क व प्रक्रिया शुल्क निश्चित करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीची शिफारस स्विकारण्यात येवून खालीलप्रमाणे शुल्कास मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १) | अर्ज शुल्क | रु.१,०००/- |
| २) | प्रक्रिया शुल्क | रु.१०,०००/- |

**[ १८ ] मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, अक्कलकोट या महाविद्यालयातील बी.कॉम. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

**(टिपणीः-** मा.अध्यक्ष, महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, अक्कलकोट यांच्याकडून शै.वर्ष २०११-१२ पासून बी.कॉम. हा अभ्यासक्रम बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.

**शै. वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याचे पाठ्यक्रमः-**
**बी. कॉम.**

मा.कुलगुरु महोदयांनी या संदर्भात खालील सदस्यांची स्थानिक चौकशी समिती नियुक्त केली होती.

| | |
|---|---|
| **१. प्रा. डॉ. ए. एन. बारबोले** | **(अध्यक्ष)** |
| **२. प्रा. बी. एन. कांबळे** | **(सदस्य)** |
| **३. प्रा. एस. बी. भांजे** | **(सदस्य)** |

मा.कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने उपरोक्त प्रमाणे समिती नियुक्त केलेल्या कार्यवाहीची नोंद दि.२०/१२/२०१० रोजीच्या विद्यापरिषदेमध्ये घेण्यात आलेली आहे.

. सदर समितीने महाविद्यालयास भेट देऊन अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. सदर समितीने महाविद्यालयातील बी.कॉम. हा अभ्यासक्रम शै. वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याची शिफारस केलेली होती. सदर अभ्यासक्रम बंद करण्याचा विषय दि.२६/०४/२०११ रोजीच्या विद्यापरिषदेच्या सभेत विचारार्थ ठेवला असता बी.कॉम. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याची शिफारस विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली आहे.

**महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (४) अन्वये विद्यापरिषदेने अभ्यासक्रम बंद करण्याबाबत शिफारस करण्याचे ठरविल्यास त्याबाबतचा अहवाल व्यवस्थापन परिषदेला सादर करावा लागतो. तसेच कलम ९२(५) नुसार विद्यापरिषदेला व्यवस्थापन परिषदेच्या पूर्वसहमतीने व शासनाच्या मान्यतेनंतर सदर अभ्यासक्रम बंद करण्यास परवानगी देता येईल.**

**सबब मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, अक्कलकोट या महाविद्यालयातील बी.कॉम. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).**

ठरावः **मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, अक्कलकोट या महाविद्यालयातील बी.कॉम. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०११-१२ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १९ ] शै.वर्ष २०१२-१३ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्याकरीता महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ सभेने तयार केलेला सन २०१२-१३ या एका वर्षाचा बृहत आराखडा विचारार्थ**

**(टिपणी :** बृहत आराखडा म.वि.कायदा १९९४ कलम ८२ (१) नुसार खालीलप्रमाणे तरतूद आहे.

म.वि.कायदा १९९४ कलम ८२ (१) तरतूद - **The university shall prepare a perspective plan and get the same approved by the State Council for Higher Education for educational development for the location of colleges and institutions of higher learning in a manner ensuring equitable distribution of facilities for having due regard, in particular, to the need of unserved and under -developed areas within the jurisdiction of the university. Such plan shall be prepared by BCUD and shall be placed before the Academic Council and the Senate through the Management Council and shall, if necessary, be updated every year**

त्याअनुषंगाने महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीने दि.३०.०६.२०११ रोजीच्या बैठकित ठराव क्रं ३ अन्वये शै.वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ या पाच वर्षीय दिर्घकालीन बृहत आराखडयास अनुसरुन शै.वर्ष २०१२-१३ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव स्विकारण्यासाठी म.वि.कायदा १९९४ कलम ८२ (१) नुसार सन २०१२-१३ या एका वर्षाचा शैक्षणिक बृहत आराखडा खालील प्रमाणे तयार करुन व्यवस्थापन परिषदेला शिफारस केला आहे.

| **अ.क्र.** | बृहत आराखडयातील ठिकाण | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| **१)** | **सोलापूर शहर** | **१. संगीत, २. विधी, ३.एम.बी.ए, हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी,**<br>**४.फुड टेक्नॉलॉजी, ५.फॅशन टेक्नॉलॉजी ॲन्ड ड्रेस डिझाईनिंग,**<br>**६.बी.कॉम ई -कॉमर्स ॲन्ड फायनान्सशियल मार्केट ,**<br>**७. मास्टर ऑफ फायनान्सशियल मॅनेजमेंट,**<br>**८.मास्टर ऑफ प्रोफेशनल अकौंटन्सी ॲन्ड ऑडिटिंग,**<br>**९.डिग्री ॲन्ड पी.जी.डिप्लोमा इन ॲप्लाईड आर्टस ॲन्ड फाईन आर्टस ,**<br>**१०.डिग्री ॲन्ड पी.जी.डिप्लोमा इन हॉस्पिटॅलिटि मॅनेजमेंट**<br>पी.जी.डिप्लोमा इन<br>**१. टॅक्सेशन, २. फायनान्स ३. ऑडिटिंग ४. रिटेल मार्केटिंग**<br>**५. फायनान्सशियल सर्व्हिसेस ६.मार्केटिंग मॅनेजमेंट**<br>**७, एच.आर.मॅनेजमेंट ८. इंटरनॅशनल बिझनेस ९. फॉरेन लँगवेजेस**<br>१०. बी.पी.ओ ११. बँकिंग फायनान्स १२. इव्हेंन्ट मॅनेजमेंट |
| **२)** | उत्तर सोलापूर | |
| | ति-हे / बेलाटी | **हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी** |
| | वडाळा | **हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी** |

| अ.क्र. | बृहत आराखडयातील ठिकाण | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| **३)** | दक्षिण सोलापूर | |
| | मंद्रुप | **विज्ञान** |
| | वळसंग | **कला, वाणिज्य व विज्ञान** |
| | होटगी / फताटेवाडी / आहेरवाडी | **कला, वाणिज्य व विज्ञान** |
| **४)** | अक्कलकोट | |
| | अक्कलकोट | **अभियांत्रिकी** |
| **५)** | बार्शी | |
| | बार्शी | **कॉलेज ऑफ फार्मसी , कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय** |
| **६)** | मोहोळ | |
| | मोहोळ | **अभियांत्रिकी** |
| | टाकळी सिंकदर | **कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय** |
| **७)** | मंगळवेढा | |
| | मरवडे | **कला, वाणिज्य व विज्ञान** |
| | सलगर (ब्रु) | **कला, वाणिज्य व विज्ञान** |
| **८)** | सांगोला | |
| | सांगोला | **पी.जी.डिप्लोमा इन मार्केटिंग मॅनेजमेंट** |
| **९)** | माढा तालुक्यातून खाली नमूद केलेल्या ठिकाणातून प्रस्ताव स्विकारले जातील | |
| | रोपळे (K) | **पी.जी.डिप्लोमा इन मार्केटिंग मॅनेजमेंट** |
| | मोडनिंब | **वाणिज्य** |
| | टेंभुर्णी | **वाणिज्य व विज्ञान** |
| **१०)** | माळशिरस | |
| | अकलूज | **पी.जी.कोर्सेस इन कॉमर्स** |
| | सदाशिव नगर | **फुड प्रोसेसिंग ॲण्ड फुड सायन्सेस** |
| | नातेपुते | **वाणिज्य** |
| **११)** | करमाळा | |
| | झरे | **बी.एस्सी पर्यावरण शास्त्र , एम.सी.ए** |
| | करमाळा | **पी.जी.डिप्लोमा इन इंपोर्ट एक्सपोर्ट मॅनेजमेंट , पी.जी.डिप्लोमा इन मार्केटिंग मॅनेजमेंट , बी.एस्सी पर्यावरण शास्त्र** |
| **१२)** | पंढरपूर | |
| | पंढरपूर | **हॉटेल मॅनेजमेंट, संगीत, पी.जी.कोर्सेस इन इंजिनिअरींग** |

**शै.वर्ष २०१२-१३ साठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोणत्याही ठिकाणासाठी बी.बी.ए, बी.सी.ए व बी.एस्‍सी (ई.सी.एस), शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र, या अभ्यासक्रमाचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.**
**सबब शै.वर्ष २०१२-१३ या एका वर्षासाठी महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ सभेने उपरोक्त प्रमाणे तयार केलेला शैक्षणिक बृहत आराखडा विचारार्थ )**

**ठरावः** **शै.वर्ष २०१२-१३ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्याकरीता महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला सन २०१२-१३ या एका वर्षाच्या बृहत आराखड्यास मान्यता देण्यात आली.**

**[ २० ]** **सोलापूर विद्यापीठाच्या आवारातील मुलींच्या वसतिगृहातील मेस चालविणे या कामाची निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी -: वरील विषयांकित सोलापूर विद्यापीठाच्या आवारातील मुलींच्या वसतिगृहातील मेस चालविणे या साठींची निविदा सूचना दि. ११/०६/२०११ रोजीच्या दै. पुण्यनगरी व दै. तरुणभारत या दैनिकांमधून देण्यात येवून अंतिम दि. २५.०६.२०११ पर्यत निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

अंतिम दिनांकापर्यत विद्यापीठ कार्यालयास पाच फर्मकडून निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. त्यापैकी सर्वात कमीत कमी दराची निविदा प्राप्त झालेल्या फर्मच्या प्रतिनिधीं सोबत दि. २८/०६/२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता वाटाघाटी करण्यात आल्या. त्यानुसार सर्वात कमी दर असलेले मे.जुगल महाराज केटरर्स, सोलापूर यांची तुलनात्मक तक्त्यामधील दराने सोलापूर विद्यापीठाच्या आवारातील मुलींच्या वसतिगृहातील मेस चालविणे साठी शिफारस करण्यात आली आहे.

सबब विद्यापीठाच्या आवारातील मुलींच्या वसतिगृहातील मेस चालविणेचे काम सोबत जोडलेल्या तुलनात्मक तक्त्यामधील दराप्रमाणे मे.जुगल महाराज केटरर्स, सोलापूर यांना अकरा महिन्याच्या कालावधीसाठी देणेबाबत विचारार्थ).

**ठरावः** **सोलापूर विद्यापीठाच्या आवारातील मुलींच्या वसतिगृहातील मेस चालविणे या कामाची निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेस व तुलनात्मक तक्त्यामधील दराप्रमाणे मे. जुगल महाराज केटरर्स, सोलापूर यांना अकरा महिन्याच्या कालावधीसाठी मेस चालविण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ २१ ] विद्यापीठास लागणाऱ्या विविध सेवांबाबतच्या कार्यवाही प्रणालीबाबत.**

(टिपणीः विद्यापीठ परिनियम क्र. ३२२ नुसार रु.१ लाखापेक्षा जास्त रकमेची खरेदी करण्याची प्रक्रिया खरेदी समितीसमोर ठेवून ती वित्त व लेखा समिती व त्यानंतर व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवली जाते. परंतु, विद्यापीठास खरेदी व्यतिरिक्त काही सेवा घ्याव्या लागतात. उदा. विविध कार्यक्रमांसाठीचा मंडप, साऊंड व्यवस्था, इमारतीची साफसफाई, मनुष्यबळ पुरवठा, कँटीन सेवा, वसतिगृहासाठी मेसची सेवा इत्यादी बाबींची सेवा घ्यावी लागते. सदरच्या सेवा या खरेदी नसून फक्त सेवा पुरविणे या प्रकारात मोडत असल्याने सदरच्या सेवा घेण्याबाबतचा कार्यवाही प्रणालीबाबत विचारार्थ).

**ठरावः विद्यापीठास लागणाऱ्या विविध सेवांबाबतची कार्यवाही खरेदी समिती व वित्त व लेखा समितीसमोर न ठेवता व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवाव्यात.**

**[ २२ ] विद्यापीठाच्या आर्थिक वर्षातील लेख्यांचे लेखापरीक्षण करण्यासाठी लेखापरीक्षकाच्या नियुक्तीबाबत.**

(टिपणी : महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५ (२) (छ) (४) नुसार व्यवस्थापन परिषदेने नियुक्त लेखापरीक्षकाकडून विद्यापीठ लेख्यांची लेखापरीक्षा करुन घेणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सोलापूर विद्यापीठाचे आर्थिक वर्षात झालेल्या व्यवहाराचे लेखापरीक्षण करुन घेण्यासाठी संवैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करावयाची असल्याने सनदी लेखापाल निवडीसाठी वित्त व लेखा समितीमधील सदस्य प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर व प्राचार्य एस. के. पवार यांची उपसमिती मा.कुलगुरु यांच्या मान्यतेने नियुक्त करण्यात आली होती.

सदर समितीने सनदी लेखापालाकडून लेखापरीक्षण करण्यासाठी प्राप्त झालेले अर्ज व सनदी लेखापाल संस्थेच्या यादीचा अभ्यास करुन विद्यापीठ व शिक्षणक्षेत्रातील लेखापरीक्षणाचा अनुभव असणाऱ्या खालील ९ सनदी लेखापालाची नावे निश्चित करुन शिफारस केली आहे.

१. सी. आर. दोशी ॲन्ड कं., सोलापूर.
२. संकपाल कुलकर्णी ॲन्ड असोसिएटस्, कोल्हापूर.
३. बी. व्ही. कुडल ॲन्ड कं., सोलापूर.
४. जी. एम. पावले, सोलापूर.
५. बिराजदार ॲन्ड कं., सोलापूर.
६. आर. आर. दोशी, सोलापूर.
७. मे. विवेक मलिकपेठकर ॲन्ड कं., सोलापूर.
८. एम. के. मुळे, सोलापूर.
९. ए. ए. पेशवे, सोलापूर.

सबब, विद्यापीठाच्या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी लेखापरीक्षकाच्या नियुक्तीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ).

**ठरावः विद्यापीठाच्या आर्थिक वर्षातील लेख्यांचे लेखापरीक्षण करण्यासाठी संकपाल कुलकर्णी ॲन्ड असोसिएटस्, सोलापूर या लेखापरीक्षकाची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ २३ ] वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाने शै.वर्ष २००६-०७ पासून बी.ए भाग १ या अभ्यासक्रमाची अतिरीक्त तुकडी १ व शै.वर्ष २००८-०९ पासून बी.ए भाग १ अतिरीक्त तुकडी १ व बी.ए भाग २ या अभ्यासक्रमाची अतिरीक्त तुकडी १ व अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमतेस विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण न घेता अतिरीक्त तुकडयां सुरु केल्यामुळे अतिरीक्त तुकडयां व अतिरीक्त विद्यार्थी प्रवेशित केल्या संदर्भात विद्या परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी :- **विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांकडून महाविद्यालयात सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थी प्रवेश क्षमता व प्रत्यक्षात विद्यार्थी प्रवेशाबाबतची माहिती या कार्यालयाच्या पत्राव्दारे मागविण्यात आली होती.**

वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर यांच्या कडूनही उपरोक्त बाबत माहिती या कार्यालयाकडे प्राप्त झालेली आहे. वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर यांना बी.ए भाग १ व २ या अभ्यासक्रमांच्या अतिरीक्त तुकडयांना खालील प्रमाणे कायम विना अनुदानित तत्वावर महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळाली आहे.

| अनु क्रं | अभ्यासक्रम | अतिरीक्त तुकडी मान्यता | सन | शासन पत्र क्रं |
|---|---|---|---|---|
| १ | बी.ए भाग १ | १ | २००६-०७ | अमवि २००६ / (११ / ०६ ) मशि - ३ दि. ०३.०६.२००६ |
| २ | बी.ए भाग १ व बी.ए भाग २ | १ | २००८-०९ | एनजीसी २००८ / (२१५ / ०८) मशि - ३ दि. १९.०६.२००८ |

**उपरोक्त अभ्यासक्रमाच्या अतिरीक्त तुकडयांना महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेच्या अनुषंगाने विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण महाविद्यालयाने करुन घेणे आवश्यक होते. तथापि महाविद्यालयाने याबाबत पूर्ण कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले असून सदर तुकडयांना विद्यापीठाचे संलग्निकरण घेतलेले नाही.**

**तथापि सन २००६-०७ पासून महाविद्यालयाने विद्यापीठाचे संलग्निकरण नसताना बी.ए भाग १ या अभ्यासक्रमाची अतिरीक्त तुकडी सुरु केलेली आहे व विद्यार्थी प्रवेशित केलेले आहेत व तसेच शै.वर्ष २००८-०९ पासून बी.ए भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या अतिरीक्त तुकडया सुरु केले असल्याचे व मान्य प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थ्यांनाही आज अखेर प्रवेशित केलेले असल्याचे महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीवरुन निदर्शनास आले आहे.**

**सदरचा विषय दि.२६.०४.२०११ रोजीच्या विद्या परिषदे समोर विषय क्रं २२० अन्वये सादर केला असता ठराव क्रं २२० नुसार खालील प्रमाणे ठराव झालेला आहे.**

"उपरोक्त संदर्भात दंडाबाबतची योग्य ती कार्यवाही करुन सदर तुकडयांना व अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमतेस प्रथम संलग्निकरण द्यावे अशी व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."

**सदरचा विषय दि. १९.०५.२०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदे समारे विषय क्रं १६ अन्वये विचारार्थ सादर केला असता खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.**

" सदरचा विषय पुनःश्च सादर करावा असे ठरले "

सबब विद्या परिषदेची शिफारस पुर्नः विचारार्थ).

**ठरावः नियमानुसार दंड आकारणीचे पत्र देवून त्यासंदर्भात पुढील कार्यवाहीचे अधिकार मा.कुलगुरुंना देण्यात आले.**

**[ २४ ] मे. आयडियल एंटरप्रायझेस सोलापूर कंत्राटी पध्दतीवर मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी ११ महिन्याच्या मुदतीकरिता मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ३०-०८-२०१० रोजीच्या झालेल्या बैठकीत ठराव क्रमांक ३५ (१) नुसार मे. आयडियल एंटरप्रायझेस, सोलापूर यांना विद्यापीठाचे पत्र क्रमांक सोविसो/आस्था/२०१०-११/४२२८ दि.१ सप्टेंबर, २०११ नुसार दि.१ सप्टेंबर, २०१० ते ३१ जुलै, २०११ या कालावधीसाठी प्रति महिना प्रति कर्माचारी रु.७९/- या दराप्रमाणे मनुष्यबळ पुरवठा करण्यास आदेश दिले होते.

तरी दिनांक १ ऑगस्ट, २०११ ते दिनांक ३० जून, २०१२ या कालावधीत प्रति महिना प्रति कर्मचारी रु.७९/- सेवा दर याप्रमाणे पुन्हा पूर्वीच्या दराप्रमाणे व त्याच शर्ती व अटी प्रमाणे व गरजेप्रमाणे मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी आदेश देण्याची बाब विचारार्थ).

ठरावः **मे. आयडियल एंटरप्रायझेस सोलापूर कंत्राटी पध्दतीवर मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी दि.१ ऑगस्ट, २०११ ते दि.३० जून, २०१२ या कालावधीकरीता (११ महिन्यासाठी) प्रति महिना प्रति कर्मचारी रु.७९/- सेवा दर याप्रमाणे पुन्हा पूर्वीच्या दराप्रमाणे व त्याच शर्ती व अटीप्रमाणे व गरजेनुसार मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ २५ ] डॉ. जगताप हनुमंत नारायण कंत्राटी प्राध्यापक शिक्षणशास्त्र विभाग यांनी महिना एकत्रित वेतन वाढवून मिळणेबाबतची केलेली मागणी विचारार्थ.**

(टिपणी : डॉ. जगताप हनुमंत नारायण यांची रितसर मुलाखत घेवून तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित वेतन रु. २०,०००/- (रु. वीस हजारावर) प्राध्यापक यापदावर नियुक्ती पत्र देण्यात आले आहे. परंतू त्यांनी हजर दिनांकापासून प्रति महिना एकत्रित वेतन वाढवून द्यावे अशी विनंती केली आहे. सदरचे पत्र सोबत जोडले आहे.

यापूर्वी डॉ. श्रीमती यशश्री शिवाजी पवार प्राध्यापक, संगणकशास्त्र संकुल यांना दिनांक ३० ऑगस्ट, २०१० रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्रं. २७ नुसार माहे वेतन रु.३०,०००/- (अक्षरी रुपये तीस हजार फक्त) यास मान्यता देण्यात आली होती.

तरी डॉ. जगताप हनुमंत नारायण यांना माहे एकत्रित वेतन वाढविण्यासंदर्भात व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठरावः **डॉ. जगताप हनुमंत नारायण कंत्राटी प्राध्यापक शिक्षणशास्त्र विभाग यांना महिना एकत्रित वेतन रु.३०,०००/- देण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ २६ ] वित्त व लेखा समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव.**

(टिपणीः खरेदी समितीची सभा दि२८/०६/२०११ रोजी सकाळी ११:३० वाजता व दि.०६/०७/२०११ रोजी दुपारी ३:०० वाजता झाली. या सभेचा कार्यवृत्तांत स्टॅट्यूट ३२४ नुसार वित्त व लेखा समितीच्या समितीच्या व व्यवस्थापन परिषदेच्या समोर मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार दि.०६ जुलै, २०११ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत सदर कार्यवृत्तांत विषय क्र. २ व विषय क्र. ३ (१) नुसार मान्यतेसाठी ठेवला असता त्यावर वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस केलेली आहे.

त्याचबरोबर Core Info. Solution Ltd., Kolhapur यांच्याकडून Software चे Updation करुन घेण्याची बाब विषय क्र. ३ (२) नुसार ठेवली असता त्यास व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.

सबब, वित्त व लेखा समितीचा दि.०६/०७/२०११ रोजीच्या शिफारशी विचारार्थ).

**ठरावः वित्त व लेखा समितीने दि.२८/०६/२०११ रोजी व दि.०६/०७/२०११ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांताबाबत केलेल्या शिफारशी खालील दुरुस्तीसह स्विकारुन मान्यता देण्यात आली.**

**अ) दि.२८/०६/२०११ रोजीच्या खरेदी समितीमधील कार्यवृत्तांतामधील :**

**१) ठराव क्र. ५ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करावी.**

**"M/s. Shree Sai Chemical, Solapur, Jaya Enterprises, Latur व Yash Traders, Solapur यांनी रसायने व काचेच्या उपकरणासाठी, ज्यांनी जास्तीची सूट दिल्याने त्या त्या फर्मशी रसायने व काचेच्या उपकरणे खरेदीसाठी वार्षिक करार करण्याबाबत शिफारस करण्यात आली".**

**[ २७ ] शास्त्रीय उपकरणे केंद्र (Instruments Center) साठी मानधनावर तज्ञ व्यक्तीची नेमणूक करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी : महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एसयुएस-२००८/(३६४/०८)/विशि-५ दि. २५ मार्च, २००९ नुसार रु. २,७८,८७,९२६/- इतके अनुदान शास्त्रीय उपकरणे खरेदी करण्यास मंजूर करण्यात आलेले आहे.

तसेच शासन निर्णय क्र. एसयुएस-२०१०/(४९/१०)/विशि-२ दि. २६ मार्च, २०१० नुसार उपकरणे कक्ष इमारतीसाठी रु. १९,३२,४२९/- इतके अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

विद्यापीठाने खालील प्रकारची शास्त्रीय उपकरणे खरेदी करण्यासाठी जाहीर निविदा मागिविलेल्या आहेत.

| Sr.No | Name of Instruments |
|---|---|
| 1 | 400 MHz NMR |
| 2 | FT-IR |
| 3 | Atomic Absorption Spectrometer |
| 4 | Elemental Analyzer |
| 5 | X-Ray Diffractometer |
| 6 | GIS Mapping & Image Processing |
| 7 | Synthesis System |

वरीलप्रमाणे शास्त्रीय उपकरणे खरेदी करावयाची असून ती महागडी, महत्वाची असल्याने ती उपकरणे हाताळण्यासाठी व निगराणी करण्यासाठी तज्ञ व्यक्तीची नेमणूक करणे गरजेचे आहे. श्री. सुरवसे दत्तात्रय नानासो यांनी त्यांच्या अर्जामध्ये (Statement of Objectives ) पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे. "b) I have strong experience in the field of instrumentation (Spectrosocpy) + Good academic background". असे नमूद केलेले आहे. त्यांनी याबाबत मुलाखतीमध्येही माहिती दिली आहे.

त्यामुळे श्री. सुरवसे दत्तात्रय नानासो सहाय्यक प्राध्यापक यांना वेतना व्यतिरिक्त अतिरिक्त मानधन देवून नेमणूक करण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः शास्त्रीय उपकरणे केंद्र (Instruments Center) साठी पूर्णवेळ तज्ञ व्यक्ती म्हणून रु.२५,०००/- प्रति महिना मान्यता देण्यात आली.**

**[ २८ ] तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशी मान्यतेस्तव.**

(टिपणीः तक्रार निवारण समितीकडे प्राप्त झालेल्या तक्रारी अर्जावर दि.०८/०७/२०११ रोजी तक्रार निवारण समितीच्या बैठकीत सुनावणी घेण्यात आली. दि.०८/०७/२०११ रोजीच्या बैठकीत सुनावणी झालेल्या तक्रार अर्जा संदर्भातील शिफारशी सोबत जोडल्या आहेत.

सदरच्या शिफारशींना परिनियम क्र. ३३५ अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सोबत जोडल्याप्रमाणे तक्रार निवारण समितीच्या शिफारशी मान्यतेस्तव).

ठरावः **तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशीस परिनियम क्र. ३३५ अन्वये मान्यता देण्यात आली.**

**मा.कुलगुरु यांच्या परवानगीचे येणारे आयत्या वेळेचे विषय :**

**[२९ (१)] सोलापूर विद्यापीठाच्या आवारातील मुलांच्या वसतिगृह येथील मेस क्र. - १ चे मेस चालविणे या कामाची निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

[**टिपणी** -: वरील विषयांकित सोलापूर विद्यापीठाच्या आवारातील मुलांच्या वसतिगृहातील मेस क्र. - १ चे मेस चालविणे या कामा साठींची फेर जाहीर निविदा सूचना दि. ३०/०६/२०११ रोजीच्या दै. एकमत या दैनिकांमधून देण्यात येवून अंतिम दि. ०७/०७/२०११ पर्यत निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

अंतिम दिनांकापर्यत विद्यापीठ कार्यालयास पाच फर्मकडून निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. त्यापैकी सर्वात कमीत कमी दराची निविदा प्राप्त झालेल्या फर्मच्या प्रतिनिधीं सोबत दि.१४/०७/२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता वाटाघाटी करण्यात आल्या. त्यानुसार सर्वात कमी दर असलेले मे.हॉटेल जय भवानी, सोलापूर यांची तुलनात्मक तक्त्यामधील नमूद केलेल्या दराने सोलापूर विद्यापीठाच्या आवारातील मुलांच्या वसतिगृहातील मेस क्र. - १ मेस चालविणे साठी शिफारस करण्यात आली आहे.

सबब विद्यापीठाच्या आवारातील मुलांच्या वसतिगृहातील मेस क्र. - १ मेस चालविणेचे काम सोबत जोडलेल्या तुलनात्मक तक्त्यामधील नमूद केलेल्या दराप्रमाणे मे.हॉटेल जय भवानी, सोलापूर यांना अकरा महिन्याच्या कालावधीसाठी देणेबाबत विचारार्थ.]

ठरावः **सोलापूर विद्यापीठाच्या आवारातील मुलांच्या वसतीगृह येथील मेस क्र. - १ चे मेस चालविणे या कामाची निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेस व तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दर असलेले मे. हॉटेल जय भवानी, सोलापूर यांना अकरा महिन्याच्या कालावधीसाठी मुलांचे वसतीगृह मेस क्र. १ चालविण्यास मान्यता देण्यात आली.**

**[२९ (२)]** **सोलापूर विद्यापीठाच्या आवारातील मुलांच्या वसतिगृह येथील मेस क्र. - २ चे मेस चालविणे या कामाची निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

[**टिपणी** -: वरील विषयांकित सोलापूर विद्यापीठाच्या आवारातील मुलांच्या वसतिगृहातील मेस क्र. - २ चे मेस चालविणे या कामा साठींची फेर जाहीर निविदा सूचना दि. ३०/०६/२०११ रोजीच्या दै.एकमत या दैनिकांमधून देण्यात येवून अंतिम दि. ०७/०७/२०११ पर्यत निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

अंतिम दिनांकापर्यत विद्यापीठ कार्यालयास तीन फर्मकडून निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. त्यापैकी सर्वात कमीत कमी दराची निविदा प्राप्त झालेल्या फर्मच्या प्रतिनिधीं सोबत दि.१४/०७/२०११ रोजी दुपारी ३.०० बाजता वाटाघाटी करण्यात आल्या. त्यानुसार सर्वात कमी दर असलेले मे.हॉटेल शिवनेरी ॲड मेस, सोलापूर यांची तुलनात्मक तक्त्यामधील नमूद केलेल्या दराने सोलापूर विद्यापीठाच्या आवारातील मुलांच्या वसतिगृहातील मेस क्र. -२ मेस चालविणे साठी शिफारस करण्यात आली आहे.

सबब विद्यापीठाच्या आवारातील मुलांच्या वसतिगृहातील मेस क्र. -२ मेस चालविणेचे काम सोबत जोडलेल्या तुलनात्मक तक्त्यामधील नमूद केलेल्या दराप्रमाणे मे.हॉटेल शिवनेरी ॲड मेस, सोलापूर यांना अकरा महिन्याच्या कालावधीसाठी देणेबाबत विचारार्थ.]

ठरावः **सोलापूर विद्यापीठाच्या आवारातील मुलांच्या वसतिगृह येथील मेस क्र. - २ चे मेस चालविणे या कामाची निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेस व तुलनात्मक तक्यातील सर्वात कमी दर असलेले मे. हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर यांना रु.१,१००/- प्रति विद्यार्थी प्रति महिना (दोन वेळेस जेवण) याप्रमाणे अकरा महिन्याच्या कालावधीसाठी मुलांचे वसतीगृह मेस क्र. २ चालविण्यास मान्यता देण्यात आली.**

**[२९ (३)] विद्यापीठाच्या कार्यालयीन कामासाठी एक नवीन वाहन खरेदी करण्याची बाब विचारार्थ.**

**(टिपणी** -: सध्या विद्यापीठाकडे हयुडांई वेरणा ही गाडी आहे. ती गाडी कार्यालयीन कामासाठी वारंवार बाहेरगावी जाते. त्यामुळे ती लांबच्या व सततच्या प्रवासासाठी सोयीची व आरामदायी नाही म्हणून कार्यालयीन कामाकरीता एक नवीन वाहन खरेदी करण्याची गरज भासत आहे. सदर खरेदीसाठी सुचित करण्यात येणाऱ्या वाहनचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **वाहनाचा तपशील व मॉडेल** | **संख्या** | **अंदाजे किंमत रु.** |
|---|---|---|---|
| ०१ | TOYOTA-Fortuner | ०१ | २५.०० लक्ष |

[अक्षरी पंचवीस लक्ष रु.फक्त]

या वाहनाचे दरपत्रक घेण्यात आलेले असून ते सोबत जोडले आहे.

सबब विद्यापीठाच्या कार्यालयीन कामाकरीता वरीलप्रमाणे एक नवीन वाहन खरेदी साठी अपेक्षित खर्च रक्कम रु.२५.०० लक्ष इतका येणार असून वाहन खरेदीची कार्यवाही सुरु करण्याबाबतची बाब विचारार्थ).

ठरावः **सदरबाबत कार्यालयीन प्रशासकीय कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**सचिव**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**